महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९५० /२०२४ दि. ०३/०९/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, कासारवडवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये याकरीता जड, अवजड वाहनांना घोडबंदर ते ठाणे वाहिनी वाहतुकीकरीता बंद करावी लागणार आहे. याकरीता सदर कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) घोडबंदर रोडने ठाणेच्या दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना **गायमुख जकात नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

२) गुजरात कडुन घोडबंदर रोडच्या दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना **चिंचोटी नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

३) मुंबई, वसई, विरार कडून घोडबंदर रोडच्या दिशेने येणाऱ्या जड अवजड वाहनांना **फाउंटन हॉटेल जवळ 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर जड अवजड वाहने चिंचोटी नाका – कामण – भिवंडी अंजुर फाटा – अंजुर चौक – मानकोली मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. ०८/०९/२०२४ रोजी (दीड दिवसाचे), दि. ११/०९/२०२४ रोजी (पाच दिवसाचे), दि. १२/०९/२०२४ (गौरी व गणपती), दि. १३/०९/२०२४ रोजी (सात दिवसाचे) व दि. १७/०९/२०२४ रोजी (अनंत चतुर्थी) या कालावधीत दुपारी १२.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मीरा भाईंदर
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे

CS CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :-**
पोलीस उप आयुक्त, मिरा भाईंदर आयुक्तालय वाहतुक विभाग
पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामिण/पालघर/ महामार्ग पोलीस
चिंचोटी वाहतूक उप विभाग, चिंचोटी
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/मुंबई/मीरा भाईंदर
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे

**प्रत** :- पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/- सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :- समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/- सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :- सपोआ ठाणे, वागळे वाहतूक विभाग, पोनि, कापूरबावडी, कळवा, नारपोली, वागळे, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/- म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner